## हिंदी विश्वविद्यालयात मराठी भाषा दिन संपन्न

### भाषा रोजगार, विकास, आत्म-सन्मानाशी जोडणे गरजेचे-डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

वर्धा (प्रतिनिधी) : कोणतीही भाषा टिकवायची असेल तर तिला रोजगार, विकास आणि आत्म-सन्मानाशी जोडणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवि तथा साहित्य, संस्कृति आणि कला समीक्षक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, नागपूर यांनी केले. ते वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात सोमवार दि. 7 मार्च रोजी आयोजित मराठी भाषा दिनाच्या



कार्यक्रमात 'मराठी भाषेचे वर्तमान आणि भविष्य' या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र होते. तर मंचावर कुलसचिव डॉ. राजेंद्र प्रसाद मिश्र, यशवंत महाविद्यालय, सेलु येथील प्राध्यापक राजेंद्र मुंढे उपस्थित होते.

विश्वविद्यालयाच्या हबीब तनवीर सभागृहात आयोजित कार्यक्रमा बोलतांना डॉ. जोशी म्हणाले की भाषा नष्ट होणे हे केवळ त्या भाषेचे अस्तित्व नष्ट होणे नसून त्या समाजाची

संस्कृतीची व संचिताची हानी होणे होय. म्हणूनच भाषेच्या मुद्याकडे गांभीर्याने विचार करणे




आवश्यक ठरते. भाषा अस्तित्वाचे संकट हे केवळ मराठीपुढेच नाही तर जगातील अनेक भाषांपुढे के संकट वर्तमान काळात दिसून येत आहे. म्हणूनच भाषांना रोजगार आणि विकासाशी जोडून त्या जगविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र म्हणाले की भाषांच्या समृद्धीसाठी त्यांचा मेळ अभिव्यक्ति, संस्कृति आणि उपयोजन यांच्याशी घालणे गरजेचे आहे. इतर भाषांमध्ये नसणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि दिवाळी अंकाची शतकोत्तर परंपरा ही मराठी भाषेच्या वैभवाची खूणच होय असे सांगून त्यांनी मराठी नाटक हे जागतिक वाड़मयामध्ये आपले वेगळे ठेवणारे आहे असे स्पष्ट केले.

मराठी भाषा दिनाची पार्श्वभूमी व मराठी भाषेची समृद्ध परंपरा विशद करतांना प्रा. राजेंद्र मुंढे म्हणाले की मराठी भाषा सुमारे दोन हजार वर्षापूर्वीची असून तिला ग्रंथ रूपाने तेराव्या शतकात समृद्धता लाभली आहे. कुसुमाग्रजांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मराठी भाषा दिन




साजरा केला जातो असे सांगून हिंदी विश्वविद्यालयात गेल्या चार वर्षांपासून नियमितपणे हा दिन साजरा होणे हे विद्यापीठाचा मराठी भाषेविषयीचा सन्मानच म्हणावयास पाहिजे असे त्यांनी नमूद केले. यावेळी कुलसचिव डॉ. राजेंद्र प्रसाद मिश्र यांनीही आपले समयोचित मनोगत व्यक्त केले. प्रारंभी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा कुलगुरुंच्या तसेच प्रा. राजेंद्र मुंढे यांचा कुलसचिव डॉ. राजेंद्र प्रसाद मिश्र यांच्या हस्ते चरखा व शॉल प्रदान करून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे यांनी केले. आभार प्रा. सुषमा खोपडे यांनी मानले. यावेळी प्रो. सुरेश शर्मा, डॉ. कृपा शंकर चौबे, डॉ. नृपेंद्र प्रसाद मोदी, शैलेश मरजी कदम, प्रदीप दाते, डॉ. अनवर अहमद सिद्दीकी, डॉ. राकेश मिश्र, राजेश लेहकपुरे यांच्यासह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.